**महात्त्वाचे**

जा.क्र.मरापप/जीसीसी/प्रशा/सं.टा./आ.३/२०२१ /858
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,
१७, डॉ आंबेडकर मार्ग, पुणे-०१
दिनांक :- 05 / ०३ / २०२१

प्रति,

संस्थाचालक / प्राचार्य --------------- (सर्व)
शासनमान्य वाणिज्य व संगणक टंकलेखन / लघुलेखन संस्था,
महाराष्ट्र व गोवा राज्य.

**विषय :- शासकीय संगणक टायपिंग प्रमाणपत्र परीक्षा (GCC-TBC) व स्पेशल स्किल इन कॉम्प्युटर टायपिंग फॉर इन्स्ट्रक्टर्स अॅण्ड स्टुडन्टस् (GCC-SSD-CTC) परीक्षा मार्च २०२१ प्रवेशपत्रातील दुरुस्तीबाबत.**

**संदर्भ :- १. या कार्यालयाची अधिसूचना दि. १ डिसेंबर २०२०**
**२. या कार्यालयाचे पत्र जा.क्र.मरापप/जीसीसी/प्रशा/२०२१/३७२ दि. २६/०१/२०२१**
**३. या कार्यालयाचे जा.क्र. मरापप/जीसीसी/प्रशा/सं.टा./२०२१/७०४ दि. २६/०२/२०२१**
**४. या कार्यालयाचे जा.क्र. मरापप/जीसीसी/प्रशा/सं.टा./२०२१/७२३ दि.२६/०२/२०२१**

उपरोक्त विषयान्वये संदर्भ क्र.१ च्या अनुषंगाने शासकीय संगणक टायपिंग प्रमाणपत्र परीक्षा (GCC-TBC) व स्पेशल स्किल इन कॉम्प्युटर टायपिंग फॉर इन्स्ट्रक्टर्स अॅण्ड स्टुडन्टस् (GCC-SSD-CTC) मार्च २०२१ ह्या परीक्षा दि. २ मार्च २०२१ ते ३१ मार्च २०२१ या कालावधीत घेण्याचे आयोजन करणेत आले आहे. संदर्भ क्र. २ नुसार या परीक्षेचे वेळापत्रकही जाहिर करणेत आले आहे.

संदर्भ क्र.३ नुसार या परीक्षांची प्रवेशपत्रही संस्था लॉगिन मध्ये देणेत आलेली आहे. सदर प्रवेशपत्रामध्ये काही दुरुस्त्या म्हणजे **स्वत:चे नाव, आडनाव, वडिलांचे / पतीचे नाव, आईचे नाव, विषय बदल, फोटो बदल (विद्यार्थ्यांच्या पूर्ण नावात बदल करता येणार नाही ) यासाठी परीक्षा परिषदेच्या १. परीक्षा समिती सभा क्र. ३० ठराव क्र. २९१ दि. १८/०३/२०१९ २. वित्त समिती सभा क्र. २७ ठराव क्र. २६० दि. ३०/०३/२०१९ ३.कार्यकारी समिती सभा क्र. ३८ ठराव क्र. ५८४ दि. १९/०३/२०१९ या ठरावांनुसार प्रत्येक चुकीस रु. २००/- शुल्क आकारुन ऑनलाईन पद्धतीने दुरुस्ती देण्यात येतील.** प्रवेशपत्रातील दुरुस्ती केल्यानंतर केलेल्या प्रिंटची प्रत संबंधित प्राचार्य यांच्या स्वाक्षरीने विद्यार्थ्यांच्या मूळ प्रवेशपत्रासोबत विद्यार्थ्यांस देणे आवश्यक आहे. सर्व संस्थाचालक / प्राचार्य यांनी या पत्रासोबत दिलेल्या फ्लोचार्ट (Flow Chart) नुसार ऑनलाईन दुरुस्तीची कार्यवाही कराणेसाठी संदर्भ क्र.४ नुसार कळवण्यात आले होते.

दि. ४/३/२०२१ पासून परिषदेच्या संकेतस्थळावर मराठी/हिंदी ३० व ४० विषयाच्या डाटा दुरुतीसाठी लिंक उपलब्ध करुन देण्यात आली आहे. यामधील फक्त विद्यार्थ्यांच्या विषय बदल करणेसाठी दि. ०६/०३/२०२१ सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत बदल करता येईल. त्यानंतर आलेले विषय बदल करता येणार नाहीत.

बदल केलेल्या इंग्रजी ३० व ४० विषयाची प्रवेशपत्रे दि. ०९/०३/२०२१ रोजी संकेस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येतील. जेणेकरुन ज्या विद्यार्थ्यांनी मराठी/हिंदी ३० व ४० ऐवजी इंग्रजी ३० व ४० बदल करुन हवा आहे. त्या परीक्षांचे फेरनियोजन करुन त्यांना इंग्रजी ३० व ४० ची परीक्षा देता येईल. उपरोक्त स्वत:चे नाव, वडिलांचे / पतीचे नाव, आईचे नाव, आडनाव, फोटो बदल हे बदल दिलेल्या नियोजनाप्रमाणे बदल करता येतील. याची सर्व संस्थाचालक / प्राचार्य यांनी नोंद घ्यावी.

(शैलजा दराडे)
उप. आयुक्त
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,
पुणे-०१

प्रत माहितीस्तव :-

१. **विभागीय शिक्षण उपसंचालक (सर्व)**
२. **शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जि. प. (सर्व)**
३. **शिक्षण निरीक्षक बृहन्मुंबई (उ/द/प)**

Scanned with CamScanner